# <u>वार्तापत्र</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय,
गडचिरोली दिनांक ०५/११/२०१७

दिनांक ०४/११/२०१७ रोजी मिळालेल्या गुप्त बातमी दाराच्या खबरेवरुन मा. पोलीस अधिक्षक सा. गडचिरोली यांचे आदेशान्वये तसेच पोलीस निरीक्षक, स्थागुशा गडचिरोली प्रदिप लांडे यांचे मार्गदर्शनाखाली नामे अमृता सुजित बिस्वास रा. येडानुर कुरखेडा जि. गडचिरोली हया आपले राहते घरी अवैद्यरित्या विदेशी दारु विक्रि करीता बाळगुन ठेवुन असल्याची गुप्त माहिति प्राप्त झालेवरुन मिळालेल्या माहितीच्या आधारे स्थागुशा गडचिरोली दारुबंदी पथकाने मौजा पुराडा येथील दोन पंचांसमक्ष नमुद आरोपीच्या घराची अवैद्य दारु संदर्भात घरझडती घेतली असता नमुद आरोपीच्या घरातुन १) मॅगडॉल नं. १ कंपनिच्या १८० मिली क्षमतेच्या ७५ निपा कि. २३,४००/- रु, २) आफीसर चॉईस ब्ल्यु कंपनीच्या १८० मिली क्षमतेच्या ६८ निपा कि. २४,४००/- रु. ३) रेस विस्की कंपनीच्या १८० मिली क्षमतेच्या २० निपा कि. ३०००/- रु. असा एकुन - ४६,८००/- रु चा माल विदेशी दारु अवैद्य रित्या विक्री करीता बाळगुन ठेवला असल्याचे मिळुन आल्याने हा माल तिचा पति सुजित सुशाल बिस्वास रा. येडानुर हा विक्री करण्याकरीता खरेदी करुन आनला असुन मी माझे पती दोघे मिळुन दारु विक्री करतो असे सांगितलेवरुन त्याच्या विरुध्द पोस्टे पुराडा येथे महा. दारुबंदी अधिनियम कलम ६५ (ई), ८३ अन्वये गुंन्हा नोंद करण्यात आला पुढील मपास चालु आहे.

सदर कारवाई मा. पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख यांच्या आदेशान्वये तसेच मा. पोलीस निरीक्षक प्रदिप आर. लांडे, स्थागुशा गडचिरोली यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि/युवराज घोडके, पोहवा/१४६१ नरेश सहारे, पोना/३०९२ दुधराम चवारे, पोना/२२५२ उध्दव नरोटे मपोशि/५०८ वैशाली चव्हाण, चापोशी/२८१७ कोल्हे योनी पार पाडली.

